दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १६ वे • अंक ३५८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२५ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## सिडको वसाहतींमधील पाणीप्रश्नी पनवेल मनपा-सिडको सकारात्मक बैठक

# निर्देशांचे पालन न झाल्यास आंदोलन : परेश ठाकूर




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, खारघर, नवीन पनवेल आणि तळोजा या सिडको वसाहतींमध्ये होणार्‍या अपुर्‍या व अनियमित पाणीपुरवठ्याच्या प्रश्नासंदर्भात बुधवारी (दि. २३) सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांच्यासोबत बैठक झाली. बेलापूर येथील सिडको भवनामध्ये झालेल्या या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून शिंदे यांनी पाण्याची समस्या दूर करण्यासंदर्भातील निर्देश दिले. दरम्यान, या निर्देशांचे पालन झाले नाही, तर आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, असा इशारा सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको वसाहतींमध्ये राहणार्‍या नागरिकांना अनेक वर्षांपासून पाण्याच्या तुटवड्याची समस्या भेडसावत आ-हेत. नुकतेच खारघर येथे पाण्याच्या प्रश्नावरून नगरसेवकांनी सिडको अधिकार्‍यांना घेराव घातला होता. त्या वेळी अधिकार्‍यांनी बुधवारी या समस्येवर सिडको भवनामध्ये बैठक घेऊ, असे सांगितले होते. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोचे सहव्यवस्थापक कैलास शिंदे यांच्यासोबत बैठक झाली.

या बैठकीला पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती संजना कदम, नगरसेवक अभिमन्यू पाटील, हरेश केणी, निलेश बावीस्कर, बबन मुकादम, प्रवीण पाटील, नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, भाजप नेते किर्ती नवघरे, अमर उपाध्याय, समीर कदम, वासुदेव पाटील यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी खारघर आणि कामोठ्यामध्ये जाणवणारा पाण्याचा तुटवडा एमजेपी आणि एमआयडीसीच्या माध्यमातून पूर्ण व्हावा तसेच कळंबोली आणि नवीन पनवेलमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन व्हावे असे निर्देश दिले तसेच पाण्याची चोरी आणि टँकरबाबत असलेल्या समस्या दूर करण्यासंदर्भातही त्यांनी निर्देश दिले.

या बैठकीसंदर्भात सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले की, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठ्याबाबत जे निर्देश दिले त्यांची अंमलबजावणी होते की नाही याची आम्ही पाहणी करणार आहोत. जर या निर्देशांचे पालन होताना दिसले नाही, तर आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल.

## पनवेल महानगरपालिकेवर महिलांचा हंडा मोर्चा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेवर पाणी टंचाईच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेतृत्वाखाली आज हंडा मोर्चा व धरणे आंदोलन करून महानगरपालिकेच्या भोंगळ कारभाराचा निषेध करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या भावना घाणेकर, नवी मुंबई निरिक्षक प्रशांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, नगरसेवक सतीश पाटील, कार्याध्यक्ष शिवदास कांबळे, मा.नगरसेविका शशिकला सिंह, शहराध्यक्षा विद्या चव्हाण, अमिता चौहान, मयेकर आदींसह मोठ्या प्रमाणात महिला आघाडी या आंदोलनात सहभागी झाली होती. गेल्या काही दिवसापासून पनवेल परिसरात पाणी पुरवठा हा अनियमितपणे व कित्येक वेळा पूर्ववेळ सुद्धा होत नसल्याने याचा निषेध करण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन महिलांनी मोर्चा काढला होता. यावेळी महानगरपालिकेच्या विरोधात निषेधात्मक घोषणा सुद्धा देण्यात आल्या. पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या दालनात शिष्टमंडळाची बैठक झाली. येत्या दोन दिवसात या संदर्भात पाणी पुरवठा विभाग, सिडको अधिकारी, एमजीपी आदींशी चर्चा करून सुरळीत पाणी पुरवठा करण्यासंदर्भात योग्य मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्यावर हा मोर्चा स्थगित करण्यात आला.

## मुंबईत आमदारांना कायमस्वरूपी घर, ३०० घरं बांधण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई ही अनेकांसाठी सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे, पण शिवसेनेने तसा कधी विचार केला नाही, असे म्हणत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तसेच, मुंबईचा एवढा गांभीर्याने विचार माझ्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांएवढा कुणी केला नाही. मुंबईतील कष्टकऱ्यांना घरे बांधून देण्यासंबंधी राज्य सरकार गांभिर्याने विचार केला असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. झोपडपट्टी पुनर्विकास, बीडीडी चाळ, पत्रा चाळ यांचा उल्लेख करताना आमदारांसाठीही मुंबईत हक्काचं घर असणार असल्याचे उद्धव ठाकरेंनी सांगितले.

१९९५ साली युतीची सत्ता आल्यानंतर झोपडपट्टीयांना घरे मिळावीत, यासाठी बाळासाहेबांनी प्रयत्न केले. मुंबईचा विचार हा अनेकदा सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून करण्यात आला. मुंबईचा एवढा गांभीर्याने विचार माझ्या मंत्रिमंडळातील

.../२

## सुधागड तालुका २१ गणपती ११ गाव मराठा समाजाचा एकमुखी व ठोस निर्णय!

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात २१ गणपती येथील पंचक्रोशीत नुकत्याच आयोजीत केलेल्या ११ गावांच्या सभेत दोन महत्वपूर्ण व एकमताने निर्णय घेण्यात आले. लग्नामध्ये दारू व डिजेला बंदी असा एकमुखी व ठोस निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होतेय.

या सभेमध्ये समाजहिताच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा झाली. वाढती महागाई, तसेच कोरोनामुळे लोकांच्या रोजगारावरही गदा आल्याने आर्थिक परस्थीती कोलमडली आहे. गोरगरीब कुटुंब हतबल झाले असून त्यांचा जगण्यासाठी संघर्ष सुरू आहे. लग्नकार्यात आर्थिक दृष्ट्या सधन व सक्षम असलेले लोक दारू पोटी लाखो रुपये उडवतात. मात्र याचा परिणाम गरिबांवर होतो. लाजे पोटी गरिबांना हि कर्ज काढून दारू ठेवावी लागते. नाहक पैसा जातो.याचा मराठा समाजाने सारासार विचार करून सिध्देश्वर भार्जे पंचक्रोशीतील लोकांनी जनरल सभा घेऊन सर्वानुमते निर्णय घेतला, ११ गावात लग्न समारंभात दारू बंदीचा महत्व-पूर्ण निर्णय घेतला. मालकाने दारू दयायची नाही, एखादा व्यक्ती दारू पिऊन आल्यास त्याला मालक जबाबदार राहणार नाही. दारू पिऊन वादविवाद तंटा पाहुण्यांनी केल्यास गाव कमिटीने पाहुण्यांना समजावून विषय शांततेच्या पध्दतीने मिटवावा.दारू पिऊन येणा-यांना जरी कोणी रोखू शकत नसले तरी अशा लोकांना शांत राहण्याचा सल्ला मालकाने द्यावा अशा प्रकारे जनरल सभेत विषय मंजूर झाले, या निर्णयामुळे गरिब कुटुंबाने

.../२

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील विविध कक्षांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालयाचे काम पूर्णत्वास येत आहे. त्या अंतर्गत विद्यालयात चेअरमन केबिन, अ‍ॅडमिन रूम, लहान मुलांसाठी प्ले रूम आणि स्टाफ रूम तयार झाली आहे. या विविध कक्षांचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील व अन्य मान्यवरांच्या हस्ते मंगळवारी (दि. २२) झाले. या वेळी उपस्थितांनी या भव्य, देखण्या आणि सुसज्ज विद्यालयाचे तोंडभरून कौतुक केले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगिरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मीनाताई जगधने, सचिव विठ्ठलराव शिवणकर, सहसचिव संजय नागपुरे, प्राचार्य शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य गणेश ठाकूर, आर. डी. गायकवाड, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिका सभागृह नेते तथा स्कूल कमिटी चेअरमन परेश ठाकूर,




न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन शरद खारकर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या प्राचार्य मुक्ता खटावकर, छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, विश्वनाथ कोळी, पी. ए. कोळी, आर. एस. भोईर, जे. एस. ठाकूर, पी. ए. गोळे, निलेश खारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### किरीट सोमय्या यांना दापोलीतच रोखू'

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

महाविकास आघाडीचे नेते आणि मंत्र्यांविरोधात आघाडी उघडणारे भाजप नेते किरीट सोमय्या हे २६ मार्च रोजी शनिवारी दापोली दौऱ्यावर येत आहेत. अनिल परब यांचे दापोली तालुक्यातील मुरुड येथील रिसॉर्ट बेकायदा असल्याचा आरोप करत हे अवैध रिसॉर्ट तोडण्यात येईल, असा इशारा सोमय्या यांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे माजी आमदार संजय कदम व शिवसेनेचे प्रभारी तालुकाप्रमुख ऋषी गुजर यांनी सोमय्या याना दापोलीत रोखून धरणार असल्याचा इशारा दिला आहे. यामुळे राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत.

किरीट सोमय्या यांच्या दापोली दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भाजप आमने सामने येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. किरीट सोमय्या यांनी मिलींद नार्वेकर यांचा बंगला तुटला असून आता अनिल परब यांचे रिसॉर्ट तोडू, असा इशारा देत सोमय्या यांनी चलो दापोली असा नारा ट्विट करून दिला होता.

किरीट सोमय्या यांच्यामुळे कोकणातील दापोली मुरुड येथील पर्यटन उद्योजकांना नोटिसा आल्या आहेत. जर कोकणातील पर्यटन उद्योगाच्या आड कोण येणार असेल तर आम्ही स्वस्थ बसणार नाही असा इशारा संजय कदम यांनी दिला आहे.

## किमान वेतन मागितल्यामुळे सुड बुद्धीने कारवाई केल्याने सर्वत्र असंतोष

### कामगारांनी नगरपालिका गेटसमोर केले काम बंद आंदोलन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिकेत सफाई कामगार म्हणून काम करत असणाऱ्या दहा सफाई कामगारांना ठेकेदाराने तडकाफडकी एकाधिकार शाहीन कामावरून काढून टाकल्याने,सदर कामगारांवर उपास मारीची वेळ आली आहे.या घटनेचा निषेध म्हणून व सदर कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी कामगारांनी नगरपालिका गेट समोर आज पासून आंदोलन सुरू केले आहे.

उरण नगर पालिकेमध्ये भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. या कॉंट्रॅक्ट कंपनीचा ठेका आहे .यामध्ये सफाई कामगार म्हणून गेले तीस वर्षे काम करीत आहेत.पुरंतु तडका फडकी एकाधिकारशाहीने दहा सफाई कामगारांना कामावरून काढून टाकले. गेली तीस वर्षांपासून काम करणारे काही कामगार हे कातकरी आदिवासी समाजाच्या महिला कामगार आहेत. वर्षानुवर्षे घाण साफ करण्याचे काम करत असलेल्या ह्या महिलांनी कधी स्वतः च्या आरोग्याची परवा केली नाही. परंतु शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतली असून कोवीड मध्येही आपल्या जीवावर बेतून काम केले आहे.आज त्या कामगारांना कामावरून टाकल्याने त्यांच्यावर ही उपासमारीची वेळ येणे हे दुर्दैवी गोष्ट आहे.

एकीकडे जिल्हाधिकारी कातकरी बांधवांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत आणि दुसरीकडे एक स्वार्थी ठेकेदार त्यांना रस्त्यावर आणत आहे. खरं तर ह्या मध्ये मुख्याधिकारी यांनी पालक संस्था म्हणून लक्ष घालून ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. एखाद्या व्यक्तीने किमान वेतन याची मागणी करणे हे भारतीय संविधानाने त्याला दिलेला अधिकार आहे.उरण नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी मागेच एक महिन्याच्या आत किमान वेतन दिले जाईल असे मान्य केले होते. आज मात्र त्यांनी आपला हक्क मागितला असता कातकरी आदिवासी आणि गोर गरीब कामगारांना कामावरून काढून टाकले आहे.

सदर घटनेबद्दल कामगार वर्गात असंतोष पसरला असून कामगारांच्या न्याय हक्कासाठी कामगारांनी गुरुवारी ( दि२४) उरण नगर पालिकेच्या गेट समोर

.../२

## चार फाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) रस्त्याच्या कामाची मुख्याधिकारी यांच्याकडून पाहणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

चार फाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) रस्त्याचे काम सुरू आहे, रस्त्यांच्या एका बाजूचे काम पूर्ण झाले आहे, त्या कामाची पाहणी आज दि.२४ मार्च रोजी नगरपरिषद प्रशासनाच्यावतीने करण्यात आली.

चार फाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) रस्ता खूप खराब झाला होता या

.../२



## पालीकरांचे आरोग्य धोक्यात ; अंबा नदीत पाली शहरातील सांडपाण्याचा शिरकाव

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहराला येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट अंबा नदीपात्रात सोडले जात आहे. त्यामुळे हे प्रदूषित पाणी पिणारे नागरिक व भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा कोणताच प्रकल्प पालीत उपलब्ध नाही. तसेच तब्बल ३७ कोटींची शुद्धपाणी योजना देखील



लालफितीत अडकलेली आहे. परिणामी भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे

.../२

# राज्यातील ८४६ पोलीस उपनिरीक्षकांना सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी बढती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील ८४६ पोलीस उपनिरीक्षकांना सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी बढती मिळाली आहे. याबाबतचे आदेश अप्पर पोलीस महासंचालक संजीवकुमार सिंघल यांनी मंगळवारी ता.२२ रोजी दिले आहेत. यामध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील ३४ पोलीस उपनिरीक्षकांचा समावेश आहे. त्यामुळे या बढती मिळालेल्या पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राज्य शासनाच्या गृह विभागाकडून मंगळवारी पोलिस उपनिरीक्षकांच्या बढतीचे आदेश जारी करण्यात आले. राज्यभरातील विविध भागातील एकुण ८४६ जणांची पदोन्नती करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील निशस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक सर्व रिक्त पदे २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत असून २५/५/२००४ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या निशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना यांच्या मूळ सेवाजेष्ठतेनुसार निशस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.



त्याचबरोबर या पदोन्नतीसाठी २०-२१ ची निवड सूची तयार करण्यात आली होती. त्यानुसार ९/२/२०२२ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्र ठरलेल्या निशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांपैकी ८४६ निशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना निशस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आल्याचे आदेशात म्हंटले आहे. त्यानुसार राज्यातील ८४६ पोलीस उपनिरीक्षकांना सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आले आहे. त्याच्याबरोबर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील ३४ पोलीस उपनिरीक्षकांचा सहभाग आहे. त्यामुळे मिळालेल्या बढतीमुळे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# डिप्लोमा इंजिनिअरिंग कॉलेजची औद्योगिक भेट

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीचे वेलशेत येथील डिप्लोमा इंजिनीअरिंग कॉलेज हे नेहमीच विद्यार्थ्यांना नवीन शिकण्याच्या संधी निर्माण करत असते. त्याप्रमाणे सिव्हिल विभागाच्या विद्यार्थ्यांनी जलशुध्दीकरण प्रकल्प, पोयनाड - अलिबाग येथे नुकतीच भेट दिली.

सिव्हिल विभागाच्या विद्यार्थ्यांनी या औद्योगिक भेटीचा फायदा घेतला. तसेच विद्यार्थ्यांसोबत सिव्हिल विभागाचे प्रमुख रुपेश थळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.स्वप्नील पाटील व प्रा. तन्वी चुटके या उपस्थित होत्या. जलशुद्धीकरण प्रकल्प, पोयनाड-अलिबागचे हेड अनिल कुमार तसेच फिल्टर इन्स्पेक्टर संदेश पाटील व निलेश दांडेकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रोजेक्टर मेंटेनन्स रिषभ म्हात्रे आणि ऑपरेटर ओंकार पाटील यांनी प्रकल्पाची इत्यंभूत माहिती दिली. त्यामध्ये सध्याचे ट्रेण्ड आणि संभाव्य नोकरीच्या संधी ह्यावर मार्गदर्शन केले. या औद्योगिक भेटी दरम्यान प्रकल्पाचे अत्यंत सुंदर छायाचित्रण करण्याचे काम सिव्हिल विभागाचा वेदांत राजेश पाटील याने केले असल्याचे अमरजा लिमये यांनी सांगितले. या औद्योगिक भेटीसाठी संस्थेचे संस्थापक किशोरभाई जैन, सीईओ कार्तिक जैन व कॉलेजचे प्राचार्य प्रवीण भारती यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या होत्या.



# मुरुड दस्तुरीनाका परिसर विविध समस्यांच्या विळख्यात : निलोफर हमदुले

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या दस्तुरी नाकाजवळ आयटीआयच्या मागील बाजूस राहात्या घरावरुन गेलेली महावितरण ची जीर्ण झालेली उच्चदाब वीज वाहिनी व वीजेचा खांब धोकादायक असून वेळप्रसंगी जिवित व वित्त हानीची शक्यता लक्षात घेऊन तातडीने हटविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या निलोफर हमदुले यांनी रायगडच्या पालकमंत्री ना.आदिती तटकरे, रोहा,मुरुड येथील वीज अभियंता व नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांना एक निवेदन देण्यात येऊन करण्यात आली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुडच्या दस्तुरी नाकाजवळ आयटीआयच्या मागील बाजूस माझे राहाते घर असून जवळच महावितरण च्या उच्चदाब वीज वाहिनीचा असलेला खांब जीर्णावस्थेत असून वाकलेला आहे.याखांबावरील उच्चदाब वीज वाहिनी माझ्या आवारातून घरावरून गेलेली असल्याने वेळप्रसंगी केव्हाही कोसळून जिवित व वित्त हानीची शक्यता नाकारता येत नाही.पावसाळ्यात याठिकाणी परिसरात पाण्याचा निचरा होत नसल्याने साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत बाहेर पडावे लागते.याचा त्रास आजुबाजूच्या लोकांना सहन करावा लागतो आहे. अशा वेळी जर जीर्ण झालेल्या व वाकलेल्या खांबामुळे तुटून, वीज वाहिनी पडून जिवित व वित्त हानीची शक्यता लक्षात घेऊन येथील जीर्ण झालेल्या उच्चदाब वीज वाहिनी व वीजेचा खांब तातडीने हटविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या निलोफर हमदुले यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

तसेच मुरुड-आगरदांडा रस्त्यालगत नगरपरिषद हद्दीत याठिकाणी पुर्वी पासून पावसाळ्यात पाणी जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मो-या(उघडी) बंद झालेल्या आहेत.यात सद्यस्थितीत एका बाजूने मोरीचा भाग बंद मुळे पाणी साचून, घरात घुसून आम्हा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे.यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.मागील दोन वर्षांपासून याठिकाणी पुरजन्य परिस्थिती निर्माण होण्याचे मिळालेले संकेत वेळप्रसंगी महाड, चिपळूण मध्ये निर्माण झालेल्या पुरस्थिती सारखा फटका बसण्याची भिती व्यक्त होत आहे.याकरीता या मो-यांतील (उघडी) पाईप काढून कॉंक्रिटिकरण करण्यात यावे.तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील सत्याची नदीतील गाळ, साचलेले दगड,माती काढून साफ करण्यात यावी व मुरुड-आगरदांडा मुख्य रस्त्याला लागून नगरपरिषद अंतर्गत रस्ता कॉंक्रिटिकरण करण्यात यावा. अशी मागणी मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंता यांचेकडे निवेदन देण्यात येऊन करण्यात आली आहे .



पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुंबईत आमदारांना कायमस्वरुपी घर, ३०० घरं बांधण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

मंत्र्यांएवढा कुणी केला नाही. आता त्या कष्टकऱ्यांना घरे मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने गांभिर्याने विचार केला आहे, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी बीडीडी चाळ आणि मुंबईतील श्रमिक वर्गांसाठीच्या घरांसंदर्भात विधानसभेत चर्चा केली. यावेळी, धारावीच्या पुनर्विकासाचं विचाराधीन आहे. पण, केंद्र सरकारच्या काही नियमावली आणि जागांचा ताबा यामुळे अडचणी निर्माण होत आहेत.

सर्वसामान्य लोकांचं झालं, आता लोकप्रतिनीधींचं काय? तर आपण जवळपास ३०० आमदारांसाठी मुंबईत घरे देणार आहोत, अशी घोषणाच मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी विधानसभेत केली. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना ही घरं देण्यात येतील. राज्याचा विषय मांडल्यानंतर कुठेतरी एक घर मिळावं, आमदार असेपर्यंत.. असं मुख्यमंत्र्यांनी म्हणताच सभागृहात हशा पिकला. त्यानंतर, आमदारांना कायमस्वरुपी घरे आपण देत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केलं.

## सुधागड तालुका २१ गणपती ११ गाव मराठा समाजाचा एकमुखी व ठोस निर्णय!

आनंद व्यक्त करून मराठा समाज कमिटी व सदस्य व श्री क्षेत्र एकवीस गणपती विश्वस्त मंडळ कमिटी व ग्रामस्थांचे आभार मानले. याच बैठकीत डिजे विषयी चर्चा झाली, लग्नाला डिजे लावायचा नाही. काही जनरल सभेत उपस्थित असलेल्या सभासदांनी सभेत डिजे लावायचा नाही या बाबत चर्चा केली, यामुळे जनरल सभेत हा विषय कमिटी, सदस्य, सभासदांच्या उपस्थित लग्नात डिजे बंद निर्णय घेतला गेला. ''डिजे मालकांनी डिजे बंद मग बेंन्जो ही बंद करा. डिजेची सुपारी(पैसे) आम्ही बेंन्जो पेक्षा कमी घेतो. ५ लाख रूपये खर्च केलेत. आम्ही काय करायचे याचा विचार समाजाने करावा. आणि आमचा व्यवसाय चालू ठेवावा अशी विनंती डिजे मालकाने केली. परंतू सभेतील लोकांनी या विषयाला कलाटणी देवून डिजे लग्नात न लावण्याचा निर्णय घेतला. या मुळे डिजे व्यवसायिक अडचणीत आले आहेत. सदर निर्णयाच्या अहवालाची प्रत आम्हाला दयावी'' अशी विनंती डिजे मालक संतोष यादव यांनी केली . सदर प्रत रायगड जिल्हा असोसियन कडे देवू असे सांगितले. यावेळी या निर्णयाची प्रत डिजेवाले मालकांना देण्याचे समाजाने मान्य केले, तसेच २१ गणपती सप्ताहाचा विषय घेऊन सप्ताह करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक गावावर प्रत्येक दिवसाची चहा पाणी व भोजनाची भाविकांसाठी जबाबदारी सोपविण्यात आली. या जनरल सभेस मराठा समाज २१ गणपती सिध्देश्वर भार्जे विश्वस्त कमिटीचे अध्यक्ष रमेश साळंके, उपअध्यक्ष अमृत पोंगडे, सेक्रेटरी गणेश दळवी, खजिनदार शंकर शिंदे, सदस्य गणपत सितापराव, चंद्रकांत चव्हाण, विश्वनाथ कदम, दगडू कदम, सतिश खाडे, मारूती हरी यादव, सखाराम राजिवडे, सागर अजिवळे, प्रकाश कदम, नथुराम भोईर. श्री क्षेत्र एकवीस गणपती सिध्देश्वर भार्जे विभागातील ग्रुप मराठा समाजाचे अध्यक्ष अशिष यादव, उपअध्यक्ष गणपत तेलंगे, सिवच महिपत जांभूळकर, खजिनदार वामण कालेकर, सदस्य गणपत चव्हाण, महादू दळवी, दिपक जाधव, गोपाळ सावंत, सप्ताह कमिटी अध्यक्ष यशवंत घोलप, उपाध्यक्ष मंगेश यादव, सेक्रेटरी राजू दळवी, खजिनदार दगडू कदम, पुई, समस्त ११ गाव ग्रामस्थ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शांततेत सभा पार पडली.

## किमान वेतन मागितल्यामुळे सुड बुद्धीने कारवाई केल्याने सर्वत्र असंतोष

बसून काम बंद आंदोलन सुरू केले आहे.यासंदर्भात म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे अध्यक्ष ड सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव यांनी सदर घटनेसंदर्भात उरण पोलीस स्टेशन मध्ये पत्र दाखल करण्यात आले आहे.सदर आंदोलनास उरण सामाजिक संस्थेने पाठिंबा दिला असून सक्रिय सहभाग दर्शविला आहे. जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर साहेब यांनी वरील विषयात लक्ष घालून वेळीच तोडगा काढून सर्व सफाई कामगार यांना कामावर कायम ठेवून कातकरी आदिवासी आणि गोर गरीब बांधवांवर होणारा अत्याचार थांबवावा अशीही विनंती केली आहे.

## रस्त्याच्या कामाची मुख्याधिकारी यांच्याकडून पाहणी

रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ होती, हा रस्ता व्हावा यासाठी भिसेगाव मधील नागरिकांची मागणी होती, त्यासाठी भिसेगाव मधील नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाची पत्र व्यवहार केला होता,याबाबत उपोषण ही करण्यात आले होते, तांत्रिक कारणामुळे रस्त्याचे काम रखडले होते, तांत्रिक अडचण दूर झाल्या नंतर एम एम आर डी ए मुंबई यांच्यामार्फत कर्जत चार फाटा ते श्रद्धा हॉटेल या रस्त्याच्या कामासाठी सुमारे ५ कोटी इतका निधी कर्जत नगरपरिषद यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता त्या अनुषंगाने रस्त्याचे काम सुरू झाले आहे.

नगरपरिषद हद्दीत असलेल्या चारफाटा ते भिसेगाव (न्यू बिकानेर) या ६०० मीटर लांबीच्या रस्त्याच्या एका बाजूचे कॉक्रीटीकरण पूर्ण झाले आहे त्याची पाहणी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आणि शहर अभियंता मनीष गायकवाड यांनी केली.

## पालीकरांचे आरोग्य धोक्यात ; अंबा नदीत पाली शहरातील सांडपाण्याचा शिरकाव

प्रदूषित पाणी वापरावे लागत आहे. या प्रदूषित पाण्याने नागरिक व भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

आत्ता पर्यंत नळाच्या पाण्यातून साप, बेडूक, शंखशिंपले व मासे आदी प्राणी आले आहेत. याबरोबरच शेवाळ, चिखल हे नेहमीच येत असते. आजूबाजूच्या कारखान्यांतून प्रदूषित पाणी देखील अंबा नदीमध्ये सोडले जाते. असे प्रदूषित व घाण पाणी नाईलाजाने लोकांना वापरावे लागते आहे. अनेक नागरिक प्रदूषित पाणी पिण्यापेक्षा कूपनलिका व विहीरीचे पाणी पिण्यावर भर देत आहेत. बहुतांश जण विकतचे बाटलीबंद पाणी पितात. नियमित पाणीपट्टी भरून देखील लोकांना असे प्रदूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने प्रदूषित पाण्यापासून आमची सुटका करावी असा सुर नागरिकांमधून उमटत आहे. या दूषित पाण्याचा परिणाम येथील मासे व जलचर प्राण्यांवर देखील होत आहे.

नुकतेच पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतमध्ये झाले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा गीता पालरेचा यांनी लवकरच शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन दिले आहे. शिवाय नगरपंचायत निवडणूक प्रचारात सर्वच पक्षाचे नेते तसेच स्थानिक मंत्री, आमदार व खासदारांनी देखील पाली शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन दिले होते. त्यामुळे ही आश्वासने नक्की प्रत्यक्षात केव्हा उतरणार या आशेवर पालीकर नागरिक आहेत.

शासनाने केलेल्या २००८ -०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणार्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण ७ कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणीद्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये हि योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न देखिल होता. मात्र पालीला ''ब'' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. तसेच शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे. सध्य स्थितीत ही योजना ३७ कोटींवर गेली आहे.

# तळोजा येथून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार त्याच्या पत्नीने तळोजा पोलीस ठाण्यात केली आहे.

प्रशांत साहेबराव सुर्यवंशी (४३), रंग गोरा, चेहरा उभट, अंगाने मजबूत, केस काळे मोठे, नाक सरळ, डोळे काळे, उंची ६ फुट असून अंगात फुल पॅन्ट व फुल शर्ट घातले आहे. तसेच उजव्या डोळ्याच्या वर जन्म खुण आहे.

त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे पो.हवा.वालचंद शिंदे मो. नं.९९६७५७०८८५ येथे संपर्क साधावा.


राव साहेब

**वकील : सौ.मनिषा प्र. तळवडकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.३५९/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.२७/०४/२०२२

१) श्रीमती.मिनाक्षी अजय गायकवाड
रा.C/o सौ.रंजना प. म्हात्रे, घर क्र.६२०,
हनुमान मंदिराच्या जवळ, बामण डोंगरी, उलवे,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) कु.लक्ष अजय गायकवाड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.संजय बाळकृष्ण गायकवाड
रा.मु.रहाटवडे, पो.खोपोली पॉवर हाऊस,
ता.खालापूर, जि.रायगड-४१०२०४
२) सौ.संगीता उर्फ अर्चना किशोर म्हात्रे
रा.रुम नं.४०२, अर्जुन निवास सीएचएस लि.,
चौथा मजला, सेक्टर ६, करंजाडे,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) सौ.वैशाली उर्फ सायली शंकर खारकर
रा.आळी आंबविली, मोहोपाडा, रसायनी,
शंकर मंदिर जवळ, करावले हाऊस, पो.मोहोपाडा,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२२ — गैरअर्जदार

वरील अर्जदार श्रीमती.मिनाक्षी अजय गायकवाड यांचे पती मयत कै. अजय बाळकृष्ण गायकवाड, रा.घर क्र.४१ (बी), मु.रहाटवडे, पो.खोपोली पॉवर हाऊस, ता.खालापूर, जि.रायगड-४१०२०४ यांचे दि.२५/०३/२०२० रोजी हरी कृष्णा क्लिनीक, मु.रहाटवडे, पो.खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड-४१०२०४ या ठिकाणी निधन झालेले आहे. सदर मयताच्या नावे मिळकत पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) घरपट्टी क्र.१७५, मु.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२१**
**क्षेत्रफळ ३१.५९ चौ.मी.**
**२) घर क्र.४१ (बी), मु.रहाटवडे, पो.खोपोली पॉवर हाऊस, ता.खालापूर जि.रायगड-४१०२०६**
**क्षेत्रफळ ४७.०४ चौ.मी.**

सदरच्या मिळकतीबाबत वरील अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार नव्हेत, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्याने लेखी हरकत जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य त्या हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याांना सदर मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२४ माहे मार्च सन २०२२ रोजी माझ्या सहीने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे मालकीची मौजे : पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे सर्व्हे नं.९३, हिस्सा नं.०, क्षेत्र ०-४८-११ अशा वर्णनाची मिळकत होती व आहे.

सदरहू मिळकती संदर्भात १) श्रीम.राधाबाई कमलाकर कडव, २) श्री.काशिनाथ कमलाकर कडव, ३) श्री.रघुनाथ कमलाकर कडव, ४) श्री.दत्तात्रय कमलाकर कडव, ५) श्री.मधुकर कमलाकर कडव, सर्व रा.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड व मे.श्री.भैरव डेव्हलपर्सचे मालक श्री.विलास आत्माराम नांदोसकर, रा.ए-३०४, यशोनारायण, स्टेशन रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचे दरम्यान दि.०९/०४/२०१२ रोजी मिळकत विकसनाचा करारनामा पूर्णत्वास गेलेला आहे.

परंतु आमचे व मे.श्री.भैरव डेव्हलपर्सचे मालक श्री.विलास आत्माराम नांदोसकर यांचे दरम्यान सदरहू मिळकती संदर्भात पूर्णत्वास गेलेल्या मिळकत विकसन करारामध्ये ठरलेल्या अटी व शर्तीनुसार मे.श्री.भैरव डेव्हलपर्सचे मालक श्री.विलास आत्माराम नांदोसकर हे वागणूक करीत नसल्याने आम्ही सदर मे.श्री.भैरव डेव्हलपर्सचे मालक श्री.विलास आत्माराम नांदोसकर यांस दि.२८/०२/२०२२ रोजी सदर कराराची पुर्तता करणेबाबत रजिस्टर्ड पोस्टाने नोटीस पाठविलेली होती व आहे. तरी देखील मे.श्री.भैरव डेव्हलपर्सचे मालक श्री.विलास आत्माराम नांदोसकर यांनी सदर कराराची पुर्तता न केल्याने त्यांचेसोबत पुर्णत्वास गेलेला दि.०९/०४/२०१२ रोजीचा करार सदर जाहीर नोटीशीद्वारे आम्ही रद्द करीत आहोत हे या नोटीशीने कळावे.

दि.२४/०३/२०२२

**सही/-**
**श्रीम.राधाबाई कमलाकर कडव**
**श्री.काशिनाथ कमलाकर कडव**
**श्री.रघुनाथ कमलाकर कडव**
**श्री.दत्तात्रय कमलाकर कडव**
**श्री.मधुकर कमलाकर कडव**
**शेत मालक**
**रा.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९१६७३७३७३३**



राव साहेब

**ॲड.मिरदे के.आय.**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०६/२०२२

श्री.प्रसाद मुखर्जी, फ्लॅट नं.२०७/२०८ मेंजीयम-१, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवीमुंबई, ता.पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२१०, श्रीमती.स्निग्धा रॉय रा.फ्लॅट नं.१४०७/१४०८ मेंजीयम-१, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२१० आणि श्री.बसाव मुखर्जी, रा.फ्लॅट नं.१३०२ ॲक्वा-ए विंग, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई. तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी कै.गायत्री मुखर्जी हे दि.११ मे २०२१ रोजी फ्लॅट नं.२०७/२०८ मेंजीयम-१, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२१० येथे मयत झाले आहेत. सदर मयताचे मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| | स्थावर मालमत्ता |
|---|---|
| १ | **फ्लॅट नं.२०७ मेंजीयम-१, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०** |
| २ | **फ्लॅट नं.२०८, मेंजीयम-१, आधिराज गार्डन, सेक्टर-५, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०** |

सदर मालमत्ता अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै.गायत्री मुखर्जी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे ०३ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वयाच्या ८३ वर्षात हरिभाऊ शिंदेंना एमएची पदवी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील निवृत्त पोलिस अधिकारी हरिभाऊ शिंदे यांनी वयाच्या ८३ व्या वर्षात एमएची पदवी घेतली आहे.



शिक्षणासाठी वयाची गरज नसते. प्रबळ इच्छाशक्ती असली की कोणतेही शिक्षण मनापासून घेता येते. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात एमए पदवीचे हरिभाऊ शिंदे यांनी शिक्षण घेऊन ते बी ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. माणूस हा मरेपर्यंत विद्यार्थी असतो. शिक्षणाची कधी चोरी होत नाही. शिक्षणामुळे माणूस मोठा होतो असे विचार हरिभाऊ शिंदे यांचे असून त्यांना आतापर्यंत महाराष्ट्र शासनाचा अण्णाभाऊ साठे पुरस्कार, रायगड जिल्हा परिषदेचा रायगड भूषण तसेच पनवेल भूषण आणि जवळजवळ १९२ पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. यापुढे मी कोणतीही परीक्षा देण्यास तयार असून मला पीएचडी करण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले.

## श्रीवर्धन समुद्रकिनारी दोन दिवसीय पर्यटन महोत्सव

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्र शासन पर्यटन संचलनालय मुंबई यांच्या अदीपत्याखाली प्रादेशिक पर्यटन संचलनालय कोकण विभाग श्रीवर्धन पर्यटन संस्था यांच्या वतीने श्रीवर्धन समुद्रकिनारी दोन दिवसीय पर्यटन महोत्सव आयोजित करण्यात आले आहे.

२६ व २७ मार्च २०२२ रोजी होत असलेल्या पर्यटन महोत्सवाची सर्वानाच उत्सुकता शिगेला पोहचली आहे .खा. सुनील तटकरे यांनी आयोजित केलेल्या व आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी नियोजन केलेल्या बीच फेस्टिव्हलची आठवण श्रीवर्धन मधील नागरिक करत आहेत. पुन्हा एकदा त्याच जोशात राज्याच्या पर्यटन विभाग पर्यटन संचालयान मुबंई व श्रीवर्धन पर्यटन संस्था यांच्या मार्फत श्रीवर्धन पर्यटन महोत्सव भरणार असून याच उदघाटन पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष खा सुनील तटकरे असणार आहेत. तर प्रमुख उपस्थिती म्हणुन आ. अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे आदी मान्यवर उपस्थित असणार आहेत.

दोन दिवसीय पर्यटन महोत्सवात दिनांक २६ मार्च रोजी वाळू शिल्प प्रदर्शन, खाद्य संस्कृती प्रदर्शन, गिधाड संवर्धन, सर्प मित्र ओळख, स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रम, स्वर गंधर्व संगीत मैफिल तर २७ मार्च रोजी मर्दानी खेळ, तर मराठी कलाकार अंशुमन विचारे यांचं चाल तुरुतुरु आदी भव्यदिव्य असे डोळे दिपवून टाकणारे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. त्याचबरोबर कोकणची खाद्य संस्कृती आदी दर्शनासाठी व विक्रीसाठी त्याचबरोबर कोकणातील काही विशिष्ट वस्तूंचे विक्रीसाठी ५० स्टोल उभारले जाणार आहेत. पर्यटन महोत्सवामुळे स्थानिक नागरिकांना आपल्या खाद्य कला कौशल्यातून रोजगाराची संधी देखील उपलब्ध होणार आहे. पर्यटन महोत्सवात सर्व पर्यटक व नागरिकांना विनामूल्य प्रवेश असून जास्तीत जास्त पर्यटकांनी व स्थानिक नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन पर्यटन संस्थेंच्या वतीने करण्यात आले आहे .


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बालाजी सिम्फनीतील आगीची घटना पैशांच्या देवाण-घेवाणीतून घडल्याचे उघड ; तरुण जेरबंद; तरुणीचा शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल मधील सुकापूर येथल बालाजी सिम्फनी इमारतीत २८ व्या मजल्यावर आठ दिवसांपूर्वी घडलेल्या आगीच्या घटनेत एका महिलेचा मृत्यू तर दुसरी महिला गंभीररित्या भाजल्याची घटना घडली होती. सदरची घटना पैशांच्या देवाण-घेवाणीतून घडल्याचे तसेच आपले पैसे वसूल करण्यासाठी आलेल्या मोहिनी ढमढेरे आणि धनंजय आंद्रे या दोघांनी भिती दाखवण्यासाठी आणलेल्या पेट्रोल अंगावर उडून सदरची घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार खांदेश्वर पोलिसांनी सदर घटनेला जबाबदार असलेल्या मोहिनी ढमढेरे आणि धनंजय आंद्रे यांच्या विरुध्द जाणिवपूर्वक मृत्युस कारणीभुत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन धनंजयला अटक केली आहे.

सदर घटनेतील मृत सरिता पताडे (४५) आणि जखमी गौरी शकंर केदारी (३६) या दोघीही नवीन पनवेल मधील सुकापूर येथील बालाजी सिंफनी इमारतीत २८ व्या मजल्यावर राहत होत्या. गौरी केदारी यांनी पुणे येथे राहणारी मोहिनी ढमढेरे आणि धनंजय आंद्रे या दोघांना सरकारी नोकरी लावण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून काही लाख रुपये घेतले होते. मात्र, अनेक महिने उलटून गेल्यानंतर देखील गौरी केदारी यांनी मोहिनी आणि धनंजय या दोघांना नोकरी न लावल्याने त्यांनी गौरीकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली होती. मात्र, गौरी केदारी त्यांना पैसे देण्यासाठी टाळाटाळ करत होत्या. त्यामुळे १५ मार्च रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास मोहिनी ढमढेरे आणि तिचा मित्र धनंजय आंद्रे दोघेही पैसे मागण्यासाठी गौरी केदारी यांच्या घरी गेले होते. यावेळी त्यांनी गौरी केदारी यांना घाबरवण्यासाठी आपल्यासोबत एका बाटलीमध्ये पेट्रोल आणि मेणबत्ती घेतली होती. यावेळी त्यांच्यामध्ये पैशाच्या देवाण-घेवाण वरुन बाचाबाची झाल्यानंतर गौरीने टेन्शनमध्ये येऊन धनंजयच्या हातातील पेट्रोलची बाटली खेचून ते स्वत:च्या अंगावर टाकले. यावेळी सरिता पताडे तिला वाचविण्यासाठी आली असताना, झालेल्या झटापटीत सरिता पाताडे हिच्या अंगावर देखील पेट्रोल पडले.

मात्र, यावेळी गौरीने मोहिनीच्या हातातील पेटती मेणबत्ती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या अंगावरील पेट्रोलने तत्काळ पेट घेतला. यात गौरी आणि सरिता या दोघीही भाजल्या. सदर प्रकार पाहून घाबरलेल्या मोहिनी आणि धनंजय या दोघांनी तेथून पळ काढला होता. यानंतर गौरी केदारी यांनी आपल्या घरातून बाहेर पळ काढला असताना आतमध्ये सरिता पाताडे या पूर्णपणे भाजल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. सदर घटनेनंतर खांदेश्वर पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने घटनास्थळी धाव घेऊन जखमी गौरी केदारी यांना रुग्णालयात दाखल केले. यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात मोहिनी ढमढेरे आणि धनंजय आंद्रे या दोघांनी घाबवरण्याच्या उद्देशाने आणलेल्या पेट्रोलमुळे सदर सर्व प्रकार घडल्याचे आढळून आले.

त्यामुळे पोलिसांनी मोहिनी आणि धनंजय या दोघांविरोधात कलम ३०४ नुसार गुन्हा दाखल करुन धनंजयला अटक केली आहे. दरम्यान, सदर घटनेत गंभीररित्या भाजलेल्या गौरी केदारी यांच्यावर ऐरोलीतील नॅशनल बर्न हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु आहेत.

## गिरणे ग्रामपंचायत विकासासाठी राजकीय समजुती ; नागेश लोखंडे यांचे होत आहे कौतुक

**दै.रायगड नगरी । तळा**

गावातील राजकारणातील गटबाजीला बाजूला ठेवत रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील गिरणे गावातील एकजुटीसाठी सगळे ग्रामस्थ एकत्र आले आहेत.गावच्या विकासासाठी तरुणांना एकत्र करून मालाठे गावचे सुपुत्र नागेश लोखंडे आणि गीरणे गावचे सुपुत्र कैलास पायगुडे यांनी इतर गावांसाठी आदर्श निर्माण केला आहे.



तळा तालुक्यातील गिरणे गाव हे जेमतेम एक हजार वस्तीचे गाव. बिनविरोध होणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये निवडणूक जाहीर होताच गावातील परस्परविरोधी गट असणाऱ्या कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्धार केला. मात्र, निवडणुकीत ग्रामपंचायतीतील उमेदवारांना जय पराजायाचा सामना करावा लागला थेट सरपंचपदी भाजपा पुरस्कृत ज्योती कैलास पायगुडे निवडून आल्या सौ. पायगुडे या सरपंच झाल्या नंतर त्यांनी अनेक विकासकामे केली परंतु मधल्या काळात काही ग्रामपंचायत सदस्य यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.ग्रामपंचायतीत या राजकारणामुळे गावात दुफळी तयार होऊ नये, सामाजिक, मूलभूत समस्येपासून गाव वंचित राहू नये अशी भावना ग्रामस्थांची होती.

गावातील या दोन गटामुळे गावचा विकास कसा होणार? असा प्रश्न जुन्या जाणत्या लोकांना पडू लागला. त्यावर विचार करत तंटामुक्त गाव होण्यासाठी गावातील सामाजिक मुलभूत प्रश्न सोडवण्यासाठी हे दोन गट एकत्र झाले पाहिजेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत गावातील दोन्ही गट एकत्र आले. गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेले गावचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार या दोन्ही गटांसह गावकऱ्यांनी केला.विकासकामे खा.सुनील तटकरे यांच्या माध्यमातून होत असल्याने त्यासाठी एकाच पक्षात राहण्याचा निर्णय संपूर्ण गावाने घेतल्यानंतर खा.सुनील तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपा माजी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे गिरणे ग्रामपंचायत सरपंच ज्योती पायगुडे आणि त्यांचे सहकारी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.गावाच्या एकजुटीसाठी हे दोन गट एकत्र आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष नागेश लोखंडे यांनी देखील कुठलीही किंतू,परंतु न करता खुल्या दिलाने त्यांचे स्वागत केले.त्यांच्या सहकार्यातून गावात एकता निर्माण होणार आहे. त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे गावातून कौतुक होत आहे. जिल्ह्यातून गावाचे एकीचे दर्शन घडत असल्याने त्यांचे कौतूक होत आहे.

## बोर्लीपंचतन येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन मोहनलाल सोनी विद्यालय येथे रविवारी २७ मार्च रोजी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने आजाराला आपण बळी पडतो. वेळच्या वेळी आरोग्य तपासणी करणे काळाची गरज आहे. गरीब व गरजूंच्या आरोग्याची मोफत तपासणी होण्यासाठी बोर्लीपंचतन येथील 'डॉ.राजेश धर्मा पाचारकर मित्रमंडळ' व 'अखंड आगरी समाज' यांच्या वतीने शिबीर घेण्यात येणार असून सर्व रुग्णांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन बोर्लीपंचतन गावचे रहिवासी डॉ.राजेश पाचारकर यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये जे.जे. हॉस्पिटल येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. शलाका पाटील, डॉ. प्रीती पाथरे तसेच स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मनीषा देवरे - गंधेवार, हृदयरोगतज्ञ डॉ. आकाश परब, डॉ. संजय ससाणे, डॉ. स्नेहा मोरे या मुंबई येथील डॉक्टरांसह डॉ. आबासाहेब पाटणकर, सचिन कोल्हे, श्रीकांत रानडे, सुनील नांदगावकर, सोनवणे, सचिन मेहता, आदित्य महामनकर इत्यादी डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात येणार आहे.

यावेळी हृदयरोग, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, कान, नाक, घसा, सबंधित आजारावर मोफत तपासणी होणार आहे.

या आजारावरील रुग्णांना तपासणी दरम्यान लागणाऱ्या औषध उपचारासाठी योग्य तो सल्ला दिला जाईल.

## डिजिटल नोंदणीसाठी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे फिल्डवर काम सुरू



**दै.रायगड नगरी । माथेरान**

पक्षाने दिलेल्या आदेशानुसार त्या आदेशाचे पालन करण्यासाठी कृतीतून कार्याची पूर्तता करणारे प्रत्येक पक्षात क्वचितच आढळतात. याचे एक अनोखे उदाहरण म्हणजे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांना अखिल भारतीय काँग्रेसच्या निर्देशांनुसार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार काँग्रेस पक्षाच्या डिजिटल मेंबरशिप कॅम्पेन गावा गावात राबविण्यात येत आहे. त्यानुसार उरण विधानसभा क्षेत्रातील कोप्रोली, पिरकोन, सारडे, वशेणी. या गावात जाऊन स्वतः जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी प्रत्येक घरी जाऊन काँग्रेस पक्षाची डिजिटल सभासद नोंदणी केली.रायगड जिल्ह्याचे काँग्रेस पक्षाचे एक कार्यतत्पर होतकरू नेतृत्व म्हणून ओळख निर्माण झालेले महेंद्रशेठ घरत यांचाही मानस आहे की पक्षाने दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी स्वतःला जरी कष्ट पडले तरी त्यात कोणत्याही प्रकारची हयगय न करता कामे पूर्ण करण्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले आहे.प्रत्येक नागरिकांना आपल्या परीने पक्षाची ध्येयधोरणे सांगून डिजिटल सदस्य नोंदणी मध्ये समाविष्ट करून घेत आहेत. यावेळी त्यांच्या सोबत रायगड जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर,रायगड जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष. अखलाक शिलोत्री, उरण तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनोद म्हात्रे, गणेश सेवक व प्रत्येक गावातील काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

## दहा ते बारा वर्षातच पाण्याची टाकी पाडण्याची नामुष्की, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील शिवकर येथे एक लाख लिटरची बांधण्यात आलेली पाण्याची टाकी फक्त दहा ते बारा वर्षातच पाडण्याची नामुष्की ग्रामपंचायतवर आली आहे. मात्र निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

भारत निर्माण कार्यक्रम २०१०-२०११ अंतर्गत तालुक्यातील शिवकर येथे एक लाख लिटरची पाण्याच्या टाकीचे काम मंजूर करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेकडून १५ लाख ९० हजार रुपये या टाकीसाठी देण्यात आले. पीसी जाधव यांनी या पाण्याच्या टाकीचे बांधकाम केले. मात्र काही वर्षातच या पाण्याच्या टाकीच्या बांधकामाला तडे गेले. ठिकठिकाणचे प्लास्टर गळू लागले. टाकीचे बांधकाम करताना पाणी पुरवठा अधिकारयानी काय पाहणी केली असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट बांधकामामुळे दहा ते बारा वर्षात पाण्याची टाकी पाडण्याची वेळ आली. काही दिवसांपूर्वी या टाकीचे ऑडिट करण्यात आले मात्र निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदार आणि कामाची पाहणी करनारयावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सरासरी पाण्याच्या टाकीचे आयुष्य तीस ते चाळीस वर्षे असते.



मात्र शिवकर येथील पाण्याची टाकी केवळ दहा वर्षातच खराब झाली. निकृष्ट बांधकाम करून ठेकेदाराने आणि कामाची पाहणी पाणी पुरवठा अधिकारयानी व्यस्थित न केल्याने ग्रामस्थांची व शासनाची फसवणूक केली आहे. पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असताना पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी काय पाहणी केली व पाण्याच्या टाकीचे बिल कसे पास केले हे गुलदस्त्यात आहे. याबाबत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस वेंगुर्लेकर यांच्याशी वारंवार सपर्क साधून देखील त्यानी प्रतिसाद दिला नाही. पनवेल पंचायत समिति येथील पाणी पुरवठा कार्यालयात पाहणी केली असता कार्यकारी अभियंता एस वेंगुर्लेकर हे वारंवार उपस्थित नसल्याचे समोर आले आहे. त्यांच्याकड़े अलिबाग येथील अतिरिक्त चार्ज आहे. त्यामुले ते कोणत्या वारी पनवेल येथे उपस्थित असतात याचा खुलासा होणे गरजेचे आहे.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : चेरवली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत ही मुळ जमीन मालकांकडून मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चेरवली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चेरवली | बाळाराम मंगळ्या भालेकर | १५/१/अ | ०-७२-०० | १०.३७ |
| | | | पो.ख.०-०३-२० | |
| | | | एकूण क्षेत्र ०-७५-२० | |
| | | पैकी विक्री क्षेत्र | ०-३५-०० | |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट, जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२३/०३/२०२२

सही/-
श्री.यशवंत विनायक गायकर
रा.कोपरा गांव, पो.खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
मो.नं.९८३३६८३४४४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी नोड : पुष्पकनगर (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड १) निमेशकुमार सत्यनारायण बोहरा, २) इंदिरा सत्यनारायण बोहरा, ३) विनीता निमेशकुमार बोहरा यांचे भाडेपट्टा मालकी हक्क तथा इतर सर्व हक्क हितसंबंधासहीत कायमस्वरुपी भाडेपट्टा हक्क हस्तांतरण तथा भूखंड विक्रीचा करार आणि इतर तद्अनुशंगिक कराराने भाडेपट्टा मालकी हक्कात हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर (दापोली) | ८७ | ८ | ९२० |

सदर जाहीर नोटीशीद्वारे सर्व व्यक्ती / लोकांस कळविण्यात येत आहे की, सदर भूखंडास अनुसरुन कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधांच्या स्वरुपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखला कराव्यात. सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर भूखंडाचा करार व अनुशंगिक दस्त कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दि.२३/०३/२०२२
ठिकाण : पनवेल

सही/-
ॲड.शरद जाधव
तळमजला, रॉयल प्राईड
बिल्डींग, भूखंड क्र.११३,
मिडल क्लास को.ऑप.हौ.सोसायटी,
पनवेल-४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९८२०६३७१७५

मा.पांडे साहेब

**श्री.सचिन बा. कांबळे**
**अर्जदारांचे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.४०२/२०२२
ने.ता.२६/०४/२०२२

सौ.वैशाली राजीव कदम
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.२०३/अ, महावीर मन्नत
बिल्डींग, प्लॉट नं.१६८, सेक्टर ०९, उलवे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कु.अनुश्री राजीव कदम हिचा जन्म दि.१६/०९/२०११ रोजी रा.फ्लॅट नं.३०१, वास्तू विहार, सेक्टर १७, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.अनुश्री राजीव कदम यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी हा जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२४/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.पांडे साहेब

**श्री.सचिन बा. कांबळे**
**अर्जदारांचे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.४०१/२०२२
ने.ता.२६/०४/२०२२

सौ.वैशाली राजीव कदम
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.२०३/अ, महावीर मन्नत
बिल्डींग, प्लॉट नं.१६८, सेक्टर ०९, उलवे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कु.श्रीकांत राजीव कदम ह्याचा जन्म दि.२६/०६/२०१३ रोजी रा.फ्लॅट नं.३०१, वास्तू विहार, सेक्टर १७, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.श्रीकांत राजीव कदम यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी हा जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२४/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

# नगरपरिषदेने निदान झाडांना संरक्षक कठडे उभारावेत ; स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून नगरपरिषदेने गावातील, मुख्य रस्त्यावर असणाऱ्या अस्वच्छते बाबतीत गांभीर्याने लक्ष देऊन स्वच्छतेवर अधिकाधिक भर दिल्यास पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. रस्त्याच्या कडेला जी झाडे लावण्यात आली होती त्यांची चांगल्या प्रकारे वाढ झालेली असून या झाडांच्या भोवती असणाऱ्या जाळ्या गंजून गेल्या आहेत त्यामुळे या झाडांची सुयोग्यप्रकारे वाढ होण्यासाठी संरक्षक कठडे उभारल्यास त्याठिकाणी क्षणभर विश्रांती साठी पर्यटकांना सोय होऊ शकते.

दरवर्षी पावसाळ्यात इथे नगरपरिषदेच्या त्याचप्रमाणे वनखात्याच्या माध्यमातून वृक्षारोपण म्हणजे एक दिखावा केला जातो एकदा का रोपे लावली की त्याकडे कुणीही ढुंकूनही पहात नाही.किती रोपे आणली आणि त्यातून किती रोपांची लागवड केली आहे किती रोपे चोरीला गेली आहेत याकडे नेहमीच दुर्लक्ष होत असते. मागील काळात काही



वर्षांपूर्वी तत्कालीन सत्ताधारी कृती समितीच्या माध्यमातून वखारी नाका ते नगरपरिषदेच्या मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा रोपांची लागवड करण्यात आली होती ती झाडे उत्तम प्रकारे जगलेली आहेत. तसेच बाजारातील सुध्दा बहुतेक ठिकाणी अशाचप्रकारे झाडे जगली आहेत त्यामुळे त्या झाडांना संरक्षक कठडे लावणे आवश्यक बनले आहे.

जुन्या जाळ्या काढून तेथील पालापाचोळा काढून सदरच्या भागांची स्वच्छता राखल्यास ही सुंदर झाडे पर्यटकांना आकर्षित करू शकतात.महात्मा गांधी मार्गावरील रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या गटारात अस्ताव्यस्त विखुरलेले सामान काढणे गरजेचे आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून रंगरंगोटीची कामे देखील पूर्ण केली जात आहेत परंतु आवश्यक ठिकाणी आकर्षक रंगरंगोटी न करता कुणाच्याही आदेशानुसार अनावश्यक ठिकाणी रंगकामे केली जात आहेत.

शतकी पार केलेल्या कपाडिया मार्केटची दगडी कमान आजही धूळ खात आहे.नगरपरिषदेच्या संबंधीत अधिकारी वर्गाने याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

## संक्षिप्त...

### इको गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा वसाहत परिसरात उभी करून ठेवलेली इको गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे.

खांदा वसाहत सेक्टर ८ बी टाइप मध्ये राहणारे रिक्षा चालक अशोक माळी यांची इको फॉर व्हीलर गाडी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सदर गाडीची चोरी ही आजूबाजूच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये चित्रीत करण्यात आल्याने चोरी उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### द्रोणागिरी नोड मधील रस्त्यांना नवा लूक

**दै.रायगड नगरी । उरण**

आधुनिक शहराची ओळख निर्माण करणाऱ्या सिडकोने उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांचे नव्याने डांबरीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे.त्यामुळे सदर रस्त्यांना नवा लूक प्राप्त झाला असल्याने रहिवाशी, प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

आधुनिक शहराचे शिल्पकार अशी ओळख असलेल्या सिडकोने उरण तालुक्यातील बोकडविरा, नवीन शेवा ग्रामपंचायत हद्दीतील सेक्टर ५० ते सेक्टर ५५ या ठिकाणा वरील रहिवाशांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी वसाहतीमधिल रस्ते चकाचक करण्याचा संकल्प हाती घेतला आहे.यासाठी उत्तम दर्जाचे रस्ते निर्माण करणाऱ्या आणि नवीमुंबई परिसरात नावाजलेल्या पी.पी.खारपाटील कंपनीला सदर रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्याचे काम दिले आहे.

पी.पी.खारपाटील कंपनीचे संचालक राजाशेठ खारपाटील,समिरशेठ खारपाटील आणि सागरशेठ खारपाटील यांनी सिडकोच्या विश्वासाला तडा जाऊ न देता.लवकरात लवकर द्रोणागिरी नोड परिसरातील उत्तम दर्जाचे रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम हाती घेतले आहे. द्रोणागिरी नोड परिसरातील रस्ते सुसज्ञ, वाहतूकीसाठी उत्तम दर्जाचे होत आहेत.

अशा चकाचक रस्त्यांवर सकाळी आणि संध्याकाळी फेरफटका मारणाऱ्या रहिवाशांची संख्या वाढत असल्याने सदर रस्त्यावर अपघात होऊ नये यासाठी रस्त्यावर गतिरोधक बसविण्याचे व रस्त्यावर पांढरे पट्टे मारण्याचे काम पी.पी.खारपाटील कंपनीने हाती घेतले आहे.त्यामुळे या परिसरातील इमारतींमध्ये नव्याने वास्तवासाठी येणाऱ्या रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

# स्व.सौ.पुष्पाताई शिरिष घरत यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनामुल्य महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरतयांच्या मार्गदर्शनाने, शिवसेना पुरस्कृत श्रीपुष्प प्रतिष्ठान फाउंडेशन अंतर्गत स्व.सौ.पुष्पाताई शिरीष घरत यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्ताने, विनामूल्य महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन शिव–सेना युवासेना सचिव वरुण सरदेसाई व पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरास नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. या शिबिरास डॉ. योगिता शिरीष घरत व डॉ. जान्हवी रामकृष्ण घरत यांचे विशेष सहकार्य लाभले.

याप्रसंगी, रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकुर, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक गुरूनाथ पाटील, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, ज्ञानेश्वर बडे, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, शहप्रमुख प्रकाश गायकवाड, प्रदीप केणी, राकेश गोवारी, प्रवीण जाधव, यतीन देशमुख, महिला उपजिल्हा संघटिका सौ.कल्पना पाटील, महानगर संघटिका ॲड.सौ.शुभांगी शेलार, महिला आघाडी पदाधिकारी, युवसेना उपजिल्हाधिकारी अवचित राऊत, पनवेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते, युवतीसेना उपजिल्हाधिकारी ॲड.सौ.योगिता पाटील तसेच शिवसेना, युवासेना व युवतीसेना, महिला आघाडी पदाधिकारी व शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणमध्ये विजेचा खेळखंडोबा

**दै.रायगड नगरी । उरण**

वीज वितरण कंपनीचा दुर्लक्षितलेमुळे उरणच्या पूर्व विभागात विजेचा सातत्याने खेळ खंडोबा सुरू झाला असून याचा नाहक त्रास येथील विद्यार्थी वर्गाला आणि सर्व सामान्य जनतेला बसत असल्याने नाराजीचा सूर उमटत आहे.

उरण तालुक्यातील पूर्व भाग विकसित होत चालला आहे विविध कम्पन्या गोदामे वसली आहेत विजेचा वापरात ही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विजेचा वापर वाढत असताना मात्र सर्व सामान्य जनतेची दररोज ची वीज गायब होऊ लागली आहे कोणत्या ना कोकत्या भागामध्ये विजेचे फॉल्ट असल्याचे कारण पुढे करत वीज गायब होते. गेल्या वीस दिवसाप–ासून हा नित्य नियम सुरू आहे. सकाळ दुपार संध्याकाळ असे तिन्ही वेळेत वीज गायब होते आहे.याचा अर्थ अधिकाऱ्यांचे विजेच्या मेंटनन्स कडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसुन येथ आहे.

उत्तम प्रतीची केबल न वापरल्याने खोपटा पुलावर तर अनेक वेळा केबल जळल्याचे प्रॉब्लेम होत आहे. या मुळे सर्व सामान्य जमलेला याचा नाहक त्रास होत आहे. त्यातच आत्ता दहावी बारावी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू आहे. त्यांच्या ही अभ्यासात व्यत्यय येत आहे. रुग्णालयात वीज कायमची लागत असल्याने या विजेच्या सततच्या गायब झाल्याने रुग्ण ही वेठीस धरले जात आहेत.

वीज तासनतास गायब असते मात्र बिल मात्र तेवढाच त्याहून अधिक दिला जातो. या विजवीतरण कंपणीच्या अधिकाऱ्यांच्या या कारभारामुळे जनता आणि विद्यार्थी त्रस्त झाले आहे.

यामुळे विजेचा होत असलेला खेळ खंडोबा थांबवावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# लोकन्यायालय विषयी मार्गदर्शन शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । दिघी**

अलिबाग येथील जिल्हा विधी सेवा समितीच्या माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावात लोकन्यायालय विषयी मार्गदर्शन शिबिर नुकतेच संपन्न झाले. श्रीवर्धन – म्हसळा तालुका विधिसेवा समिती व श्रीवर्धन– म्हसळा तालुका वकील संघटना यांच्या समन्वयाने हे कायदेविषयक मार्गदर्शन आणि लोकन्यायालयाचे महत्व या विषयावर शिबीराचे आयोजन करण्यात आले.

सदर शिबिरात सभेच्या अध्यक्षा तथा निवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश श्रीमती एन. टी. घाडगे यांच्यासह, ॲड.विठोबा पाटील व ऍड. आदेश शिरवटकर या तज्ञ वकीलांनी विधी सेवा समितीचे कार्य व सर्वसामान्यांसाठी न्याय या विषयांवर उपयुक्त मार्गदर्शन केले. या प्रसंगी वडवली ग्रामपंचायत सरपंच प्रियंका नाक्ती, आगरी समाज अध्यक्ष संतोष नाक्ती, मुस्लिम समाज वरचा मोहल्ला अध्यक्ष रिझवान चिविलकर, पोलीस पाटील दिलीप नाक्ती, ग्रामसेवक गणेश माळी, बबन नाक्ती, संदीप बिराडी, नवनाथ कांबळे, चंद्रकांत पाटील, श्याम धुमाळ, सुदेश कांबळे, ग्रामपंचायत सदस्या मनिषा कांबळे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने वडवली ग्रामस्थ बंधू भगिनी यांनीं घेतला. या शिबिराचे संयोजन विधी स्वयंसेवक निलेश नाक्ती, दिपक कांबळे व किरण चाळके यांनी श्रीवर्धन न्यायालयाचे माळी यांच्या सहकार्याने केले. सहकार्य सामाजिक शिक्षण संस्थेच्या डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम वाचनालय सभागृहात हे शिबीर संपन्न झाले.

# धारदार चाकूने केले वार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

किरकोळ भांडणातून धारदार चाकूने वार केल्याप्रकरणी आर–ोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा–नावडे रोड येथील आशिष तेकाम हे मजुरीचे काम करतात. बांधकाम साइटवर ते ब्रेकर मशीन चालवतात. या ठिकाणी त्यांचा काम करणारा मित्र श्यामचरण मलगाम (२२) यांच्याशी त्यांची मैत्री आहे. श्यामचरण आणि आशिष यांच्यामध्ये किरकोळ गोष्टीवरून भांडण सुरू झाले. यावेळी त्याला मारहाण करण्यात आली. त्याचा राग आल्याने श्यामचरणने भाजी कापण्याच्या चाकूने वार करून त्यांना जखमी केले. श्यामचरण गणेश सिंग मलगाम याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा/०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र–१ दिनांक ३०/११/२०१८

महाराष्ट्र शासन

**प्रपत्र १**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता**

**उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, यांत्रिकी भवन, पहिला मजला, दापोडी, पुणे–४११०१२**

ई–मेल : eehdmddpd@gmail.com दूरध्वनी क्रमांक : (०२०) २७१४४७२०

**निविदा सूचना क्रमांक १२ सन २०२१–२०२२ शुद्धीपत्रक १**

खालील कामाच्या सिलबंद निविदा नमुना ब–१ मध्ये कार्यकारी अभियंता, उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे १२, यांत्रिकी भवन दूरध्वनी क्र.०२०/२७१४४७२० हे खालील प्रकारच्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या ठेकेदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे १२ यांचेकडून खाली निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत शनिवार व रविवार व सार्वजनिक सुट्ट्या सोडून देण्यात येईल. कार्यकारी अभियंता हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दि.१३/०४/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०० वा. कार्यकारी अभियंता, उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे १२ यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रुपये) (वस्तू व सेवा कर / कामगार कल्याणनिधी / विमा वगळून) | बयाणा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | पुरवठ्याचे ठिकाण | निविदा फॉर्म कोणास देय आहे | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलोते मोकाशी ल.पा. तलाव, ता.खानपूर, जि.रायगड येथील सेवा द्वार व ८ टन क्षमता उद्घालक व ए फ्रेम ॲरेजमेंट व एप्रोज ब्रिज दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत. | ४,२३,३१७/– | ४,३००/– | ९० दिवस पुरवठा आदेशाच्या दिनांका पासून | कलोते मोकाशी ल.पा. तलाव | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारास | रु.२०००/– (अधिक ३६० जीएसटी) रु.२५००/– पोस्टाने मागविल्यास |
| २ | भिलवले ल.पा.तलाव, ता.खानपूर, जि.रायगड येथील सेवा द्वार व ८ टन क्षमता उद्घालक व ए फ्रेम ॲरेजमेंट व एप्रोज ब्रिज दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत. | ४,२७,२४९/– | ४,३००/– | ९० दिवस पुरवठा आदेशाच्या दिनांका पासून | भिलवले ल.पा. तलाव | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारास | रु.२०००/– (अधिक ३६० जीएसटी) रु.२५००/– पोस्टाने मागविल्यास |

| | |
|---|---|
| निविदा विक्री कालावधी | दिनांक २८/०३/२०२२ दुपारी १५.०० पासून दिनांक ११/०४/२०२२ सायंकाळी १७.३० पर्यंत |
| निविदा स्वीकृत दिनांक | दिनांक १३/०४/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता |
| निविदा उघडणे | दिनांक १३/०४/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता |

१) कार्यकारी अभियंता, उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे यांचे कार्यालयात नोटीस बोर्डवर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल.

२) कोऱ्या निविदेची किंमत रोखीने किंवा मनी ऑर्डर द्वारे स्वीकारण्यात येई. कोऱ्या निविदेची किंमत चेक / पोस्टल ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट द्वारे स्वीकारण्यात येणार नाही.

३) सदर निविदा पोस्टाने पाठविल्यास सिलबंद पाकिट देवाण घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा मिळण्यास विलंब झाल्यास त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४) अटी व शर्ती असणाऱ्या एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा हक्क कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

खालील संकेतस्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

५) www.mahayantriki.gov.in

(सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.) कार्यकारी अभियंता, उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे–१२ यांचे कार्यालयातील सुचना फलक

अर्हता :

१) सविस्तर निविदा सुचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्यांनी अशा प्रकारची तत्सम प्रकारची व किमान निविदा किंमती एवढे रकमेची किमान कामे करून मागणीदारांना समाधानकारक रित्या पुरवठा केलेला आहे. त्यांनी आवश्यक ती प्रमाणपत्रे कंत्राटदाराने कार्यालयात निविदा घेतेवेळी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

२) अशा प्रकारच्या कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत सादर केल्याशिवाय कोरी निविदा कागदपत्रे दिली जाणार नाहीत.

३) जे कंत्राटदार वरील नमूद केलेल्या आवश्यक अटींपैकी एकही अट पूर्ण करू शकणार नाहीत त्यांना निविदापत्र दिले जाणार नाही.

४) यांत्रिकी संघटनेंतर्गत कंत्राटदाराने नोंदणीकृत आवश्यक नाही.

जावक क्र./उ.स.नि.वि./लेखा–२/निविदा/५१६/सन २०२२

उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, दापोडी, पुणे–१२ यांचे कार्यालय

दिनांक : १७/०३/२०२२

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२८०/४९२/२०२२

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**उद्घालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग**
**दापोडी, पुणे ४११०१२**


# आपत्कालीन स्थितीत आवश्यक असणारे रेस्क्यू (विमोचन) साहित्य होमगार्ड संघटनेस जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते सुपूर्द

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

होमगार्ड संघटना ही मानसेवी संघटना ही मानसेवी स्वरुपाची असून पोलीस दलास सहाय्यकारी म्हणून कार्यरत आहे. आपत्कालीन स्थितीत स्थानिक प्रशासनाला मदत कार्यातही सहकार्य करते. त्या उद्देशाने मानसेवी होमगार्ड सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येवून त्यांना मदत कार्यात सहभागी करून घेतले जाते. आपत्कालीन स्थितीत आवश्यक असणारे रेस्क्यू (विमोचन) साहित्य होमगार्ड कार्यालयाकडे उपलब्ध असल्यास त्याचा उपयोग होमगार्डना प्रशिक्षण देण्यासाठी करता येवू शकतो. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेनुसार जिल्हा समादेशक, गृहरक्षक दल तथा अपर जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड यांना हायबीम सर्च लाईट – ४, एल.ई.डी फ्लड लाईट विथ बॅटरी ऑपरेटर – ४, ८mm रोप, १०mm रोप, १२mm रोप (प्रत्येकी १०० मीटर), वॉकी टॉकी हॅण्ड सेट – ४, फर्स्ट एड बॉक्स – ५, तंबू – ५, मेगा फोन – २, चेन सॉ/वूड कटर – २ हे साहित्य आज दि.२४ मार्च २०२२ रोजी उपलब्ध करुन देण्यात आले.



साहित्य वाटप कार्यक्रमावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा समादेशक तथा अपर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, तहसिलदार (महसूल) सचिन शेजाळ, तहसिलदार विशाल दौंडकर, तहसिलदार अलिबाग श्रीमती मिनल दळवी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक व इतर अधिकारी उपस्थित होते.

यापुढेही गृहरक्षक दलातील स्वयंसेवकांना विविध संस्थांकडून प्रशिक्षण व साहित्य उपलब्ध देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी यावेळी दिल्या. तसेच चक्रीवादळ, पूर, दरड कोसळणे इ. नैसर्गिक आपत्तींमध्ये आवश्यक असणारे साहित्य तहसिल स्तरावर देखील उपलब्ध करुन देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या संकल्पनेनुसार पोलीस दल व गृहरक्षक दलातील ४० अधिकारी/कर्मचारी, स्वयंसेवकांना भुवनेश्वर येथे चक्रीवादळ आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. जिल्हयातील गृहरक्षक दलास साहित्य उपलब्ध झाल्याने गृहरक्षक दलाची क्षमता वाढल्याचे अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी यावेळी सांगितले.